**Sahaja Yoga Central Commitee of India**
(Formed as per instructions given on July 20, 2008 by Mataji Shree Nirmala Devi, after Guru Puja)

communications@syccindia.org



Her Holiness Mataji Shree Nirmala Devi
*(Founder of Sahaja Yoga)*

## सेंट्रल कमिटी ऑफ इंडिया(सीसीआय) द्वारा सूचित / जून/2020- II

## सहज योगाचे व्यापारीकरण – I

*"सहज योग" या त्यांच्या पुस्तकातील पहिल्याच अध्यायात, परमपूज्य श्री माताजी लिहितात "**हि एक जिवंत प्रक्रिया आहे जी पैशात मोजली जाऊ शकत नाही". ** म्हणूनच अनेक अगुरु जे ह्यातून पैसे कमावतात, आणि अनेक पंथ आणि पंथविरोधी जे केवळ पैसे कमवण्याचा दिखावा करतात,हे सर्व सहजयोगाच्या अतिशय विरोधात आहेत.*
*सहजयोग हे शुद्ध परमेश्वरी प्रेम आहे जे जीवंत व अमूल्य आहे. **ह्यातील उपचारांसाठी व कुंडलिनी जागृती साठी पैसे आकारले जाऊ शकत नाहीत.**"*

https://www.amruta.org/book-sahaja-yoga/chapter-1-sahaja-yoga/

सहज योगाचे सर्वात महत्त्वाचे आणि वैशिष्ट्यपूर्ण तत्व हेच आहे की, तुम्हि आत्मसाक्षात्कार अथवा कुंडलिनी जागृती साठी पैसे आकारु शकत नाहीत. परमपूज्य श्री माताजींची शिकवण आणि इतर अगुरु व पंथ यांची शिकवण यामधील हाच एक वैशिष्ट्यपूर्ण फरक आहे.

श्री माताजींनी कधीही कोणत्याही स्वरुपात सहजयोगाचे व्यापारीकरण केले नाही आणि त्यांनी त्यांच्या अमृतवाणीतून सहजयोगाच्या व्यापारीकरणाचा स्पष्टपणे निषेध केला आहे.

*" सर्वप्रथम सहजयोगामध्ये आपल्याला हे माहीत असले पाहिजे की **आपण ह्यातून कोणत्याही प्रकारे पैसे कमवू शकत नाही. सहज योगाला धरून तुम्ही कोणताही व्यवसाय करू शकत नाही...***
*तर,सर्वात प्रथम आपण सहजयोगात कधीही कोणत्याही स्वरुपाचा व्यवसाय करणार नाहीत, आणि जर कोणी करण्याचा प्रयत्न केला तर त्यांना कशाप्रकारे काढता येईल ते मी पाहून घेईन.म्हणून सहजयोगामध्ये व्यावसायिक उपक्रम नसावेत. **सहज योगाच्या नावाखाली कोणत्याही व्यावसायिक गोष्टी सुरू करू नयेत.**"*

***ख्रिस्तमस पूजा, सरबिटन(यु.के), २१ नोव्हें. १९८३.***

सहजयोगाचे व्यापारीकरण व सहजयोगाच्या कार्यासाठी पैसे आकारण्याच्या विरोधात श्री माताजीं च्या अमृतवाणी मधील काही उतारे परिशिष्ट I मध्ये समाविष्ट केले आहेत.

श्री माताजींच्या शिकवणीनुसार, "**सहजयोगाचे व्यापारीकरण सर्वात वाईट शत्रू** " असे सीसीआय चार्टर च्या पॅरा ३ मध्ये नमूद केले आहे. आणि सीसीआय चार्टर च्या पॅरा ६ मध्ये "**कोणत्याही प्रकारे सहजयोगाचे व्यापारीकरण होऊ नये" असे नमूद केले आहे.** (सीसीआय चार्टर ची पूर्ण कॉपी साठी भेट द्या- http://www.syccindia.org)

आमच्या असे निदर्शनास आले आहे की अनेक सहजयोगी/ गट व संस्था सहजयोगाच्या वरील मूलभूत तत्वांचे पालन करत नाहीत आणि सहजयोगाच्या शिकवणींचा व सहजसाहित्याचा वापर करून त्यांनी पैसे कमवण्यास सुरुवात केली आहे. ह्या संदेशामध्ये आपण सहजयोगाचे व्यापारीकरण ह्या विषयावर डिजिटल माध्यमातून चर्चा करणार आहोत.



communications@syccindia.org

प्रामुख्याने सहजयोग्यांच्या अध्यात्मिक उन्नती च्या उद्देशाने आतापर्यंत सहजयोगाचे साहित्य अगदी सहजपणे (विनामूल्य)उपलब्ध करून देण्यात आले आहे.अनेक सहजयोग्यांनी/संस्थानी हे विनामूल्य उपलब्ध असलेले सहज साहित्य/ व्हिडिओ त्यांच्या स्वत:च्या यु ट्युब चॅनेल वर पोस्ट केलेले आहे. डिजिटल वाहिन्यांवरील दर्शकांची वाढती संख्या, सहजयोग्यांच्या वाढत्या उपस्थिती मुळे जाहिरात एजन्सी त्यांच्या जाहिराती या चॅनेल वर देण्यासाठी आकर्षित होत आहेत, आणि काही सहज योगी/ संस्था नी ह्या विनामूल्य उपलब्ध असलेल्या सहज साहित्याचा वापर करून पैसे कमावण्यासाठी संधीसाधून फायदा करून घेतला आहे.
त्याचप्रमाणे सहजयोग साहित्याचे व्यापारीकरण फेसबुक व इतर सोशल मिडियावर ही दिसून येत आहे.यदाकदाचित या जाहिराती त्यांच्या माहिती शिवाय नकळतपणे आलेल्या असतील,तर सहजयोगी ना/संस्था ना त्या जाहिराती सहज साहित्यामधून काढून टाकण्याचा सल्ला देण्यात येतो .
परिशिष्ट II मध्ये सहजयोग साहित्याच्या व्यापारीकरणाची काही स्पष्टपणे उदाहरणे दर्शविली आहेत.

सहज योग साहित्याचा वापर करून पैसे कमावणाऱ्या सहजयोगी/संस्था ना विचारण्यासाठी आपल्या कडे खालील काही प्रश्न आहेत.:
१) जे सहज साहित्य त्यांच्याकडून वापरले गेले आहे त्यासाठी त्यांनी पैसे दिले आहेत का?ते विनामूल्य नव्हते का?
२) सहजयोग साहित्यामध्ये जाहिरातींसाठी परवानगी देऊन आणि त्यातून पैसे कमावून त्यांनी सहजयोगाचे व्यापारीकरण केले नाही का?
३) हे श्री माताजींच्या मूलभूत शिकवणींचे उल्लंघन नाही का?

**अशाप्रकारे जाहीरपणे चालणारे व्यापारीकरण सुरू ठेवण्याला सीसीआय मान्यता देत नाही**. या द्वारे आम्ही सर्व यु ट्युब चॅनेल/ सोशल मिडिया पेजेस ना त्यांच्या वैयक्तिक आर्थिक फायद्यासाठी सहजयोग साहित्याचा वापर करण्यापासून परावृत्त होण्याचा सल्ला देत आहोत. जर हे थांबवले नाही, तर सीसीआय ला ही यु ट्युब चॅनेल/सोशल मिडिया पेजेस जबरदस्तीपूर्वक थांबवावी लागतील तसेच त्यामागील कार्यरत असलेल्या व्यक्ति/ संस्था ना जाहीरपणे उघड केले जाईल. पुढे जाऊन सहजयोग्यांना आणि सहज सामुहिकतेला या यु ट्युब चॅनेल/सोशल मिडिया पेजेस ना भेट न देण्याचा सल्ला दिला जाईल.

संपूर्ण अध्यात्मिक इतिहासात सहजयोग ही मानवाला मिळालेली सर्वात मोठी देणगी व आशिर्वाद आहे. आपण खूप भाग्यवान व आशिर्वादित आहोत की आपल्याला श्री माताजींच्या शुद्ध प्रेमातून सहजयोग हा पूर्ण पणे नि:शुल्क त्यांच्याकडून मिळाला आहे.म्हणून सहजयोगाचे व्यापारीकरण करणे हे अजिबात न्यायाला धरून नाही, आणि हे सहजयोगाचा सतत अपमान करण्या सारखे आहे. सहजयोगाच्या व्यापारीकरणा पासून परावृत्त होण्याचा तसेच सहज साहित्याचा गैरवापर थांबवण्याचा सल्ला आम्ही सर्वांना देत आहोत. सहजयोगाच्या मूलभूत तत्वाबरोबर कोणतीही तडजोड होऊ शकत नाही.सहजयोग्यांकरीता, साधन हे त्याच्या परीणामांइतकेच महत्त्वाचे आहे.

सहजयोगाच्या व्यापारीकरणाच्या इतर प्रकारांबाबत सीसीआय येत्या काळात संवाद साधेल.

**सर्व सभासद, सहज योग सेंट्रल कमिटी आॅफ इंडिया.**
**२८ जून, २०२०.**





communications@syccindia.org

# परिशिष्ट I

## परमपूज्य श्री माताजी निर्मला देवी यांच्या अमृतवाणी मधील काही उतारे. (व्यापारीकरण व पैसे आकारण्या संदर्भात)

"सर्वप्रथम ,सहजयोगात आपल्याला माहीत असले पाहिजे की आपण ह्यातून कोणत्याही प्रकारे पैसे कमवू शकत नाही.सहज योगाला धरून तुम्ही कोणताही व्यवसाय करू शकत नाही..
तर, सर्वात प्रथम आपण सहजयोगात कधीही कोणत्याही स्वरुपाचा व्यवसाय करणार नाहीत, आणि जर कोणी करण्याचा प्रयत्न केला तर त्यांना कशाप्रकारे काढता येईल ते मी पाहून घेईन. सहज योगाच्या नावाखाली कोणत्याही व्यावसायिक गोष्टी सुरू करू नयेत."

- ***ख्रिस्तमस पूजा, सरबिटन(यु.के.), २१ नोव्हें.१९८३.***
https://www.amruta.org/1983/11/21/pre-christmas-talk-london/

"आता अशी काही लोक आहेत जे सहजयोगाच्या पैशांचा गैरवापर करतात आणि सहजयोगाचे व अनुषंगाने कधी कधी सहजयोग्यांचे शोषण करतात.आणि अशी लोक खूप अशुभ होतात.जे कोणी असे करण्याचा प्रयत्न करतील ते अपमानित होऊन सहजयोगा बाहेर जातील.अशा व्यक्तिंच्या कधीही जवळ जाऊ नये,अशा व्यक्तिंशी काही संबंध ठेऊ नये,अशा लोकांना कोणतीही सहानुभूती दाखवू नये.कारण हा अशुभ पणा कोणालाही कितीही प्रमाणात त्रासदायक ठरू शकतो.म्हणून अशा व्यक्तिंपासून दूर राहणे चांगले."

- ***श्री एकादश रूद्र पूजा, कोमो (इटली), १६ सप्टेंबर १९८४.***
https://www.amruta.org/1984/09/16/shri-ekadesha-rudra-puja-como-1984/

"मागच्या वेळेस मी तुम्हाला सांगितले होते की तुम्ही देवासाठी पैसे देऊ शकत नाहीत.तुम्हि पैसे देऊ नाही शकत. तुम्हि तुमच्या जागृती साठी पैसे देऊ शकत नाहीत, तुम्ही कोणाच्याही द्वारे देवाचे व्यापारीकरण करू शकत नाहीत,मग ते चर्च असो किंवा इतर काहीही, तुम्ही त्यांचे व्यापारीकरण करू शकत नाहीत. ते विनामूल्य च असले पाहिजे कारण सर्व काही जे दैवी आहे ते विनामूल्य आहे."

- ***पब्लिक प्रोग्राम, क्वालालंपूर, मलेशिया, २३मार्च १९८३.***
https://www.amruta.org/1983/03/23/public-program-kuala-lumpur-malaysia-1983/

"पण कुंडलिनी जागृती हि एक अशी गोष्ट आहे ज्याचे व्यापारीकरण होऊ शकत नाही.ते मिळवण्यासाठी तुम्ही पैसे देऊ शकत नाही."

- ***पब्लिक प्रोग्राम, हॅम्पस्टेड, लंडन (यु.के.), ६ जून १९८०.***
https://www.amruta.org/1980/06/06/why-are-we-here-hampstead-1980/

"काही लोकांनी कुंडलिनी योग, कुंडलिनी जागृती च्या नावाने उद्योग चालू केले आहेत. हि व्यावसायिक गोष्ट नाही. हि एक जिवंत प्रक्रिया आहे. तुम्हि त्यांचे व्यापारीकरण करू शकत नाही.त्याच्या प्राप्तीसाठी तुम्ही पैसे देऊ शकत नाही."

-***पब्लिक प्रोग्राम, मॅकबिन हा◌ॅल, सिडनी (आ◌ॅस्ट्रेलिआ), २२ मार्च १९८१.***
ttps://www.amruta.org/1981/03/22/talk-at-the-maccabean-hall-sydney-1981/





"मी येथे काही जणांना जागृती दिली, आणि ते खूपच मजेशीर होते. त्यांनी लोकांकडून त्यांच्या वायब्रेशन करीता शुल्क आकारण्यास सुरूवात केली. फक्त कल्पना करा? त्यांना ते काहीही खर्च न करता मिळाले, पण त्यांनी लोकांकडून शुल्क आकारण्यास सुरूवात केली, आणि जेव्हा ते भारतात आले,आम्हाला जाणवले की त्यांनी त्यांची वायब्रेशन गमावली होती,ते खूपच तापलेले होते आणि आम्हि त्यांना सांगितले," तुम्ही यासाठी शुल्क आकारू शकत नाही. तुम्ही कसे आकारले? तो म्हणाला,"आम्हि कसे जगायचे? मी म्हणाले,"ह्या आधी तुम्ही कसे जगत होता?" तसेच जगा. "आम्हि शाळात शिक्षक होतो" तर मी म्हणाले,"तेच करा." तुम्ही या वायब्रेशन साठी शुल्क आकारु शकत नाही, हे दैवी आहे, हे प्रेम आहे, तुम्ही शुल्क आकारु शकत नाही- ते तुम्ही विकू कसे शकता? तुम्ही करू शकता? तुम्ही तुमच्यातील प्रेम विकू शकता?"

- ***पब्लिक प्रोग्राम , दुसरा दिवस,न्यूयॉर्क(यु एस ए),२१ सप्टेंबर १९८१.***
https://www.amruta.org/1981/09/21/public-program-2-new-york-1981/

"आता हे एखादे प्रास्ताविक व्याख्यान नाही, आधी विनामूल्य आणि नंतर त्यासाठी पैसे आकारले जातील , हे असे नाही आहे. तुम्हाला काही पैसे आकारले जाणार नाहीत. हे सर्व ज्ञान मिळवण्यासाठी तुमच्या कडून शुल्क आकारले जाणार नाही."

- ***पब्लिक प्रोग्राम,ब्रिसबेन,(आॅस्ट्रेलिआ),१७ एप्रिल १९९४.***
https://www.amruta.org/1994/04/17/public-program-brisbane-1994/

"आता, अनेक जणांना आश्चर्य वाटते की मी काही पैसे आकारत नाही.सर्वात प्रथम, तुम्ही प्रेमासाठी पैसे कसे आकारू शकता? आणि हे प्रेम ,जे अगदी उस्फूर्त आहे? मी काही ही करत नाही, मी फक्त आपल्या समोर उभी आहे, मी काही ही करत नाही आहे. पण ते प्रेम सर्वत्र प्रवाहित होत आहे आणि तुम्हाला जागृती मिळत आहे,ती फक्त माझ्या उपस्थिती मुळे,मी काही करत नाही,हे तुमचं स्वत:च आहे. जे काही तुमचं स्वत:च आहे,हि कुंडलिनी तुमची स्वत:ची आहे,तुमची इच्छा हि तुमची स्वत:ची आहे आणि जर तुम्ही तुमची जागृती प्राप्त करता आहात, ती तुमची स्वत:ची आहे. तेथे काय आहे ज्या साठी शुल्क आकारले जाईल?"

- ***पब्लिक प्रोग्राम ,युनिटि चर्च.ह्यूस्टन,(यु एस ए),३० मे१९८६.***
https://www.amruta.org/1986/05/30/public-program-houston-1986/

"काय तुम्ही लोकांना येण्यासाठी आणि तुम्हाला पाहण्यासाठी पैसे आकारता?
श्री माताजी: अजिबात नाही, तुम्ही कसे शुल्क आकारु शकता?, हा अपमान आहे, तुम्ही प्रेमासाठी शुल्क कसे आकारू शकता? लोकांना समजत नाही,हे जे काही आहे ते दैवी आहे, ज्यासाठी तुम्ही पैसे आकारू शकता नाही, हा परमात्म्याचा अपमान आहे.
- ***परमपूज्य श्री माताजी निर्मला देवी एबीसी रेडिओशी बोलताना. सिडनी, आॅस्ट्रेलिआ,१५ मार्च १९८३.***
https://www.amruta.org/1983/03/15/abc-radio-interview/

**प्रश्न:** ओह, तर मी विचारु इच्छितो, अशा लोकांबद्दल काय जे चक्र थेरपी करतात आणि ते खूप जास्त पैसे आकारतात? कदाचित ते खूप जास्त किंमती नसेल आणि ते लोकांना मदत करत असतील आणि अद्याप लोकांकडे तेवढे पैसे देण्यासाठी नसतील. मी आपल्याला विचारू इच्छितो की अशा लोकांबद्दल काय जे चक्र थेरपी करतात आणि पैसे आकारतात?
**श्री माताजी**: "तुम्ही जागृती शिवाय चक्र थेरपी कशी घेऊ शकता? तुम्ही या सर्व मूर्ख लोकांवर विश्वास ठेवता. मी आता काय करायचे? तुम्ही त्यांच्यावर का विश्र्वास ठेवता? मला माहित नाही ,सर्वसामान्य भारतीय हे समजू





शकेल …चक्र थेरपी ही फक्त संत च करू शकतात. ते संत असलेच पाहिजेत. ते पैसे कसे आकारू शकतात? हे तुम्हि समजून घ्या की, संत तुमच्याकडून एक पै हि घेणार नाही."

- ***पब्लिक प्रोग्राम, पहिला दिवस. न्यूयाॅर्क (यु एस ए) १९ सप्टेंबर १९८१.***
https://www.amruta.org/1981/09/19/public-program-1-new-york-1981/

"पण,हे पहा गोष्ट अशी आहे की लोक बोलतात की सहजयोगा मध्ये दोष आहे, की तुम्ही काही पैसे आकारत नाही.आणि ते मला प्रश्न विचारतात, तुम्ही पैसे का नाही आकारत? त्यांना मी एवढंच सांगितले, की हि तुमच्या उत्क्रांती ची जीवंत प्रक्रिया आहे.जेव्हा तुम्ही बियाण पेरता, बियाणे किती शुल्क आकारते? कींवा माळी बियाणाला काही शुल्क आकारतो? ते स्वत:च अंकुरते. त्यामध्ये ती शक्ती अंगभूत असते.अशाच प्रमाणे तुम्हा सर्वांमध्ये हि शक्ति अंगभूत आहे."

- ***व्हि आय पी रिसेप्शन, २३ सप्टेंबर २०००.***
https://www.amruta.org/2000/09/23/vip-reception-forum-hotel-london/

**पत्रकार**: तुम्ही अजिबात पैसे आकारत नाहीत?
**श्री माताजी:** अजिबात नाही. मी ह्यासाठी शुल्क कशी आकारू शकते, हे प्रेम आहे, दैवी प्रेम. मी त्यासाठी पैसे कसे आकारू शकते?"

- ***टिव्हि मुलाखत, २१ आॅक्टोबर १९८२, यु.के.***
https://www.amruta.org/1982/10/21/tv-interview-plymouth-1982-london-england/

"एक भारतीय होता ,ज्याला मी अमेरिकेत जागृती दिली,ज्याने त्याची स्वत:ची संस्था चालू केली.भारतीय हे नेहमीच पैसे बनवण्यात खूप हुशार आहेत, ते कुठेही असुदेत, ते पैसे कमावतील. आधी हा नीट वागत होता , आणि नंतर त्याने त्याची संस्था चालू केली . आणि मला लिहून पाठवले," मी सहज योग करत आहे, मी हे करत आहे, आणि अनेक लोक येत आहेत." त्याने त्यासाठी फी ठेवली. मला माहित नाही तो हे कशाप्रकारे चालवत होता. अर्थात, तुम्ही अन्नासाठी शुल्क आकारु शकता, हे ठीक आहे, तुम्ही राहण्यासाठी शुल्क आकारु शकता. पण जेव्हा तो आला--मुबई मधील लोक हि अतिशय संवेदनशील आहेत---त्यांनी मला सांगितले, " ह्या माणसाबरोबर आम्हाला चक्कर येते, त्याच काय प्रकरण आहे? आम्हाला खूप अस्वस्थ वाटत आहे. मी म्हणाले, "काळजी करू नका. मी शोधून काढेन." जेव्हा तो आला, मी म्हणाले, "मी तुमच्या माहितीपत्रकावर एक नजर टाकू शकते का?" त्या माहितीपत्रकात लिहिले होते, "सर्वसाधारण वायब्रेशन साठि १२५ डाॅलर.स्पेशल वायब्रेशन साठि २८० डॉलर." मी म्हणाले, "सर हे कशासाठी?" तो म्हणाला, "मदर मी कसे जगायचे?" मी म्हणाले, "तुम्ही काय करत होता?" तो म्हणाला,"मी शिक्षक होतो." मी म्हणाले, "तुम्हि तुमच्या शिक्षणासोबतच पुढे जा. तुम्हि तुमचे वायब्रेशन मिळवण्यासाठी मला किती पैसे दिलेत की ह्या प्रकारे तुम्ही तिथे सर्व गोष्टी करत होता?" तो म्हणाला, "पण मी कशा प्रकारे जगणार?" आणि तो रागाने लालबुंद झाला. आता, "मी तुमच्याशी याबाबत बोलू शकते. तुम्हि या करीता एक हि पैसा घेऊ शकत नाही."
अनेक जागृत आत्मे आहेत.अशी माणसं आहेत ज्यांना सहजयोगा ची माहिती आहे. पण त्यांना माहीत आहे, की तुम्ही हे विकू शकत नाही. जर तुम्ही असे काही करण्याचा प्रयत्न केलात तर - संपलात - तुम्ही ताबडतोब तुमचे वायब्रेशन गमवाल. ते अतिशय... अतिशय संवेदनशील असतात. जर तुम्ही अज्ञानी असाल, तर ठिक आहे, ते राहतील. परंतू जाणीवपूर्वक तुम्ही काही चुकीचे केलेत, तर ते निघून जातील."

- ***पब्लिक प्रोग्राम, इंग्लंड, २२ जून १९८२.***
https://www.amruta.org/1982/06/22/public-program-reading-1982/

## परिशिष्ट II

| यूट्यूब चैनल नाव . : ऑलेग द्याचैनको | |
|---|---|
|  |  |
| श्री हनुमान चालीसा - श्री माताजींच्या फोटो सहित. | श्री हनुमान चालीसा - जाहिराती सोबत |

| यूट्यूब चैनल नाव . : कैलाश कुमार | |
|---|---|
|  |  |
| थंड आणि चैतन्याने परीपूर्ण ध्यान संगीत - जाहिराती विना | थंड आणि चैतन्याने परीपूर्ण ध्यान संगीत - मधेच जाहिराती सहित |





## यूट्यूब चैनल नाव . : News DNN




सहज योग-एक अद्वितीय शोध आणि मानवतेला भेट - जाहिराती विना




सहज योग-एक अद्वितीय शोध आणि मानवतेला भेट - जाहिराती सोबत कार्यक्रम.

## यूट्यूब चैनल नाव : कुंडलिनी जागरण




सहज योग कसा करावा .ध्वज (बॅनर) - जाहिराती सहित.




सहज योग कसा करावा . - कार्यक्रमा च्या मध्ये जाहिराती सहित.

| **यूट्यूब चैनल  नाव : प्रतिष्ठान,पुणे, इंडिया** | |
|---|---|
|  |  |
| प्रात: ध्यान २४ जून२०२० - जाहिराती विना. | प्रात: ध्यान २४ जून२०२०, ध्वज (बॅनर) - जाहिराती सहित. |





| **यूट्यूब चैनल नाव  : प्रतिष्ठान,पुणे, इंडिया** | |
|---|---|
|  |  |
| प्रात: ध्यान २६ जून२०२० - जाहिराती विना | प्रात: ध्यान २६ जून२०२० - मधेच जाहिराती सहित. |

| **यूट्यूब चैनल नाव : प्रतिष्ठान,पुणे, इंडिया** | **यूट्यूब चैनल नाव : SY India** |
|---|---|
|   |   |
| जल क्रियेवर कार्यशाळा- जाहिराती सहित | कुंडलिनी जागरण कसे करावे. - जाहिराती सहित |

| **यूट्यूब चैनल नाव .: सहजयोग टीवी** |
|---|
|   |
| श्री माताजींचे प्रवचन- जाहिराती सहित. |